# प्रकरण १४

## हस्तपुस्तिका – १५

## संस्थेने दिलेल्या सवलती, परवाने किंवा प्राधिकारपत्रे प्राप्त करणा-यांचा तपशील

(परिपत्रक क्र.सीपीए/६८०६ दि.०२.०५.२०१८)

परिपत्रक क्र.एमओएम/८९८३ दि.०२.०९.२००६ नुसार मनपातील कार्यालयीन कर्मचा-यांना अपरिहार्य कारणास्तव उशीर झाल्यास पूर्ण वेळ कामाकाजाच्या दिवशी एका वेळेस एक तास (कार्यालयीन कामाची वेळ सुरु झाल्यापासून) असे महिन्यातून ०३ वेळा कार्यालयात उशीरा उपस्थित रहाता येईल.

अनु. क्र.१३

पूर्व नियोजित वेळेपासून कार्यस्थळी उपस्थिती ३० मिनीटांपर्यंत विलंबाने नोंदविण्याची सुविधा अवधीनंतर आणि कामाची नियोजित वेळ सुरु झाल्यापासून एका तासापर्यंत तीन पेक्षा जास्त वेळा उपस्थिती नोंदविल्यास-

प्रत्येक उशीरा उपस्थितीसाठी (जितकी मिनीटे उशिर होईल तितक्या मिनीटांची) प्रणाली स्वंयचलित पध्दतीने कर्मचा-याच्या वेतनातून UDT (Rate per minute x non attended time in minute – 4UDT – Unattended Duty time) ह्या wage type द्वारे वजावट करेल.

कामाची नियोजित वेळ सुरु झाल्यापासून एका तासानंतर उपस्थिती नोंदविल्यास – प्रणाली अर्ध्या दिवसाची नैमित्तिक रजा कापेल.

ब) नैमित्तिक रजा शिल्लक नसल्यास अर्जित रजा / विनावेतनी रजा (LWP) या क्रमाने स्वयंचलित पध्दतीने रजेचे परिगणन करेल.उदा.

| नियोजित कामकाजाची वेळ | उपस्थितीची विलंबाने नोंद | लेट मार्क ११.०० ते ११.३० | ११.३० नंतर आल्यास |
|---|---|---|---|
| १०.३० ते १७.३० | ३० मिनीटांपर्यंत – ११.०० पर्यंत)<br>कर्तव्यकाळ पूर्ण | पहिले ३ लेटमार्क वगळता उरलेल्या सर्व लेट मार्क करीता- | अर्ध्या दिवसाची नैमित्तिक रजा |

| | | | |
|---|---|---|---|
| | करणे. | उदा.११.०५ ला आल्यास ५ मिनीटे व ३० मिनीटे<br>(१०.३० ते ११.००) कर्तव्यकाळ भरून काढणे. | |

परिपत्रक क्र.प्रकाअ/१५०४/एमसी/दि.०५.०३.२०२०

परिपत्रक क्र.प्रकाअ/१५०४/एमसी/दि.०५.०३.२०२० च्या अनुषंगाने सर्व प्रशासकीय कार्यालयांची आणि प्रशासकीय कार्यालयात काम करणा-या कर्मचा-यांच्या कामाकाजाची वेळ सोमवार ते शुक्रवार सकंळी १०.०० ते सायंकाळी ६.०० पर्यंत राहील.

सर्व प्रशासकीय कार्यालयातील कार्यालयीन शिपाई, हमाल, कामगार (वर्ग-ड चे कर्मचारी) कामकाजाची वेळ सोमवार ते शुक्रवार सकाळी ९.३० ते सायंकाळी ६.३० पर्यंत राहील.

एका महिन्यात केवळ दोन वेळा १० मिनिटे उशिरा येण्याची मुभा राहील. तथापि, तदनंतर  परिपत्रक क्र.सीपीए/६८०६ दि.०२.०५.२०१८ हे कायम असून परिपत्रकामध्ये नमूद केलेल्या 'कार्यस्थळी नियोजित कामकाजाच्या वेळेत येण्यास झालेल्या विलंबाबाबतची' कार्यवाही देखील सदर परिपत्रकातील अनु क्र.१३ नुसारच कायम राहील.